"**डस्टर**" या बाबीची दर निश्चितीबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**उद्योग संचालनालय,**

**नवीन प्रशासन भवन, मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना, मुंबई-४०० ०३२.**

**आदेश क्रमांक. उसं/भांखस/डस्टर/दरनिश्चिती/२०१८-१९/(३८)/२०१८/** डी-४६३०

**दिनांक:-** 2 AUG 2018

**वाचा :- १) शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. भांखस - २०१४/ प्र.क्र. ८२/ भाग- III/ उद्योग -४, दिनांक ३०/१०/२०१५**

**२) मध्यवर्ती भांडार खरेदी समितीची बैठक दि.३०/०६/२०१८ चे इतिवृत्त.**

शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची सुधारित नियमपुस्तिका दि.०१/१२/२०१६ मधील परिच्छेद ५.१५ नुसार परिशिष्ट-१८ मध्ये अंध व अपंग संस्थांनी उत्पादीत केलेल्या वस्तूंना आरक्षण देण्यात आले आहे. सदर संस्थांनी उत्पादीत केलेल्या वस्तुंची दरनिश्चिती मध्यवर्ती भांडार खरेदी समितीमार्फत करण्यात येते. त्यानुसार "**डस्टर**" या बाबीची **सन २०१८-१९** या वर्षासाठी दरनिश्चिति करण्यासाठी **मे. दि. एन.एस.डी. ब्लाईंड इंडस्ट्रियल होम, वरळी, मुंबई** या संस्थेने सादर केलेल्या प्रस्तावानुसार, मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेच्या, भांडार खरेदी समितीने दि.३०/०६/२०१८ रोजीच्या बैठकीत "**डस्टर**" या बाबीचे सन २०१६-१७ मध्ये निश्चित केलेले दर कायम ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. "**डस्टर**" बाबीचे निश्चित केलेले दर खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | दरनिश्चिती बाब | कच्चा माल | सन २०१८-१९ करीता निश्चित केलेले दर (रुपये) |
|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. |
| १. | **कॉटन डस्टर,** ७५सें. मी. X ७५ सें. मी. वजन १२० ग्रॅम (प्रत्येकी नग) | वार्प २/२० कॉटन(६०ग्रॅम) उभे धागे- ३६ प्रती इंच, वेप्ट ६ इंच (६५ ग्रॅम) आडवे धागे -२४ प्रती इंच, धागा ४ मी. (६० नंबर) | प्रति नग दर रुपये ३९.०० मुंबई मध्ये मोफत पोहोच. |
| | | | प्रति नग दर रुपये ४१.०० मुंबई बाहेर संपूर्ण महाराष्ट्रात मोफत पोहोच. |

सदर दरनिश्चितीची विधिग्राह्यता दि.३०/०४/२०१९ पर्यंत राहील. डस्टर या बाबीसाठी जर वस्तू व सेवा कर (GST) लागू असेल, तर या बाबींकरीता GST हा वर नमूद केलेल्या दरावर अतिरिक्त राहील. सदर दर खरेदीदाराच्या कार्यालयापर्यंत मोफत पोहोच असे आहे.

संस्थेनी स्वतः उत्पादन केलेल्या वस्तूंचा शासकीय कार्यालयांना पुरवठा करावा, बाजारातून वस्तू विकत घेवून शासनास पुरवठा करु नये. संस्थेच्या अंध व अपंग व्यक्तीकडूनच शासकीय कार्यालयानी दिलेले कामे पुर्ण करुन घ्यावेत.

**पुरवठा कालावधी:-** मागणीपत्र मिळाल्यापासून कमीत कमी ०८ आठवड्याच्या आत मालाचा पुरवठा करणे आवश्यक राहील. तसेच शासकीय कार्यालयास केलेल्या पुरवठयाबाबतचा अहवाल दर महा मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेस सादर करावा.

**देय रक्कमेबाबतच्या अटी :-** मागणीकार कार्यालयाने माल प्राप्त झाल्यावर कामाचे त्वरीत निरीक्षण करावे. निरीक्षणात मालामध्ये आढळलेल्या उणीवा/ त्रुटी/ दोष ताबडतोब पुरवठादारांच्या व मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेच्या / खरेदी समितीच्या नजरेस आणाव्यात. ही कार्यवाही वस्तु पुरवठ्याच्या तारखेपासून १५ दिवसात करण्यात यावी. मालाचा निरीक्षण अहवाल प्राप्त झाल्यानंतर ९०% रक्कम ०२ आठवडयामध्ये संस्थाना द्यावी व उर्वरित १०% रक्कम सर्व कामे पुरवठा आदेशानुसार सुस्थितीत व विनिर्देशांप्रमाणे झाल्यानंतर ३०दिवसांपर्यंत करणे आवश्यक राहील. पुरवठा कालावधीमध्ये मालाचा पुरवठा न झाल्यास उशीरा पुरवठा केलेल्या मालाच्या किंमतीवर ०.५% प्रती आठवड्या प्रमाणे दंड मागणीकारामार्फत आकारला जाईल व त्याची कमाल मर्यादा खालीलप्रमाणे असेल.

अ) पुरवठा कालावधी मध्ये पुरवठा न केलेल्या कामाची किंमत दोन लाखापेक्षा कमी असेल तर अशा किंमतींच्या १०% दंड आकारला जाईल.

ब) पुरवठा कालावधी मध्ये पुरवठा न केलेल्या मालाची किंमत दोन लाखापेक्षा जास्त असेल तर अशा किंमतीच्या ५% दंड आकारला जाईल.

सदरील दंडाची वसूली करण्याची संपूर्ण जबाबदारी मागणीकार कार्यालयाची असेल. पुरवठा होणा-या मालाची/ वस्तूची गुणवत्तेबाबतची तपासणी मागणीकार कार्यालयाने आवश्यकते नुसार करावी.

वरील संस्थेने शासकीय कार्यालयास केलेल्या डस्टर पुरवठयाबाबतचा अहवाल प्रत्येक महिन्याला मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेस सादर करावा.

**उद्योग सह संचालक (भां.ख.)**
**विकास आयुक्त (उद्योग) यांचेकरीता.**

**प्रति,**

१) मे. दि. एन.एस. डी. ब्लाईंड इंडस्ट्रियल होम, बी. डी. डी. चाळ क्र.५२, वरळी, मुंबई- ४०० ०१८.
२) निवड नस्ती.